


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १७६ वा मंगळवार दि २६ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# फडणवीसांच्या होम ग्राऊंडवर भाजपची नो रिस्क पॉलिसी
# नागपुरात कशी आहे भाजपची रणनीती?

वृत्तसंस्था/ नागपूर

राज्यात तब्बल साडे तीन वर्षांपासून रखडलेल्या महापालिका निवडणुकांचा श्रीगणेशा झाला आहे. शनिवारी प्रभाग रचनेचे प्रारूप जाहीर झाले असून ही प्रभाग रचना २०१७ नुसारच ठेवण्यात आली आहे. यावरून दीड दशकांपासून नागपूर महापालिकेत सत्तेत असलेल्या भाजपने कुठलीही ङ्गरिस्कफ घेतलेली नाही, असे दिसत आहेत. तर काही प्रभागात अगदी किरकोळ बदल आहेत. साडेतीन वर्षांहून अधिक काळापासून लांबलेल्या महापालिकेच्या निवडणुकांचे प्रभाग रचनेचे प्रारुप वेळापत्रकानुसार शुक्रवारी रात्री जाहीर झाली. महापालिका मुख्यालयाच्या हिरवळीवर आणि संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ४ सप्टेंबरला दुपारी ३ वाजेपर्यंत हरकती व सूचना नोंदवता येणार आहे. प्रारुप जाहीर झाल्यानंतर आता तब्बल साडेतीन वर्षानंतर शहरात राजकीय घडामोडींना वेग येणार आहे. भाजपचे शहराध्यक्ष व माजी महापौर दया शंकर तिवारी यांचा प्रभाग क्रमांक ११ बजेरिया आणि आजूबाजूच्या वस्त्या यांच्यात फारसा बदल दिसून येत नाही. तसेच मध्य नागपूरचे आमदार व माजी नगरसेवक प्रवीण दटके यांचा प्रभाग क्रमांक दहा दक्षिणामूर्ति या मध्येही फारसे बदल दिसून येत नाहीत. याशिवाय भाजपचे वरिष्ठ नगरसेवक व माजी स्थायी समिती अध्यक्ष अविनाश ठाकरे यांचा प्रभाग क्रमांक ३५ यामध्येही काहीच बदल झालेला नाही. या प्रभावात केवळ जुने पुनर्वसन सीमारेषेत समावेश आहे. परंतु या प्रभागात शिवणगाव असा उल्लेख नाही. तो प्रभाग क्रमांक ३८ मध्ये आहे. हा एका वस्तीचा संभ्रम या प्रभागात दिसून येत आहे. प्रभाग क्रमांक ३८ काँग्रेसचे वरिष्ठ नेते व माजी नगरसेवक प्रफुल गुडधे यांचा प्रभाग आहे. भाजपचे विधान परिषद सदस्य व माजी महापौर संदीप जोशी यांचा प्रभाग क्रमांक १७ यामध्येही काहीच बदल झाल्याचे दिसून येत नाही. भाजपचे माजी स्थायी समिती अध्यक्ष नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर यांचा प्रभाग क्रमांक २३ मध्ये सर्व जुन्याच वस्त्यांचा समावेश आहे. राज्य सरकारने प्रभाग रचना करताना २०१७ च्या सीमारेषा ठेवल्या असून त्यामधील एखाद दुसऱ्या वस्तीचे नाव इकडे तिकडे केले आहेत. मात्र, प्रभाग रचना २०११ च्या जनगणनेनुसार आणि २०१७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीच्या प्रभाग रचनेनुसारच असल्याचे दिसून येत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार प्रभागांचे सीमांकन लोकसंख्येच्या आधारावर करण्यात आले असून ते ५७ ते ७१ हजारांच्या घरात आहे. नागपूर शहरातील ३७ प्रभागात चार नगरसेवक, तर ३८ व्या प्रभाग ही तीन नगरसेवकांचा असणार आहे. २०१७ च्या प्रभागरचनेत किरकोळ बदल सोडल्यास फारसे बदल नाहीत. प्रभाग रचनेचे प्रारुप शनिवारी प्रसिद्ध झाल्यानंतर शहरात खऱ्या अर्थाने राजकीय घडामोडींना सुरुवात होणार आहे. प्रभाग रचना करताना महापालिकेकडून सीमांकन नेमके कशाप्रकारे करण्यात आले, कोणते भाग कोणत्या प्रभागाला जोडण्यात किंवा तोडण्यात आले आहे हे स्पष्ट झाले.



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राज्याच्या नगरविकास विभागाकडून यासाठी आवश्यक असलेली प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात येत आहे. २०१७ नंतर निवडणूका होणार असल्याने त्यासाठी प्रभाग रचनेचे स्वरुप नागपूर महापालिकेकडून तयार करून राज्य सरकारला पाठवण्यात आले होते. राज्य सरकारकडून हे निवडणूक आयोगाला पाठवण्यात आले असून आयोगाकडून शुक्रवारी रात्री उशिरा जाहीर केले.

# प्रत्येक वेळी सत्ता असेल तरच काम होत नाही, संबंध महत्त्वाचे...
# अजित पवारांचा कार्यकर्त्यांना सल्ला, चर्चांना आले उधाण..



वृत्तसंस्था/ नागपूर

उपमुख्यमंत्री अजित पवार गुरुवारी विदर्भ दौऱ्यावर असताना नागपूर येथे पक्षाच्या कार्यकर्त्यांसोबत बैठक घेण्यात आली. या बैठकीत नागपूर शहराध्यक्ष प्रशांत पवार यांनी थेट अजित पवारांसमोर नाराजी व्यक्त केली. पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या समस्या त्यांनी उघडपणे मांडल्या. यावर प्रत्युत्तर देताना अजित पवारांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, प्रत्येक वेळी सत्ता असेल तरच काम होते असे नाही, आपण अधिकाऱ्यासोबत कसे संबंध ठेवतो यावर बरेच ठरते. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मी जिथे जातो तिथे तेथे लोकांच्या कामासाठी स्वतंत्र स्टाफ ठेवलेला आहे. ङ्गपण माझ्या स्टाफने सांगितलं की माझ्याकडे कोणीच येत नाही आणि काम सांगितलं तरी कोणी पुढे येत नाही. त्यामुळे केवळ तक्रार करून काही साध्य होत नाही, ते पुढे म्हणाले की, उपमुख्यमंत्री असल्याने सगळेच काम होतात असे नाही. घटनेने सरकार चालते, काही कामात मार्ग निघतो काही कामात निघत नाही. सरकार हे घटनात्मक चौकटीत चालते. ङ्गप्रत्येक काम होईलच असे नाही. काही कामे नियमात बसतात, काही नाही. जेव्हा एखादं काम होणार नाही असं वाटतं, तेव्हा मी सरळ सांगतो की हे शक्य नाही,फ असे त्यांनी स्पष्ट केले. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कामाची जबाबदारी कार्यकर्त्यांवर असल्याचे सांगत अजित पवार म्हणाले की, ङ्गतुम्ही काम केले तरच लोक तुम्हाला मत देता असे नाही तर तुम्ही कोणता मुद्दा उचलता आणि ते आवडत त्यावरून लोक मत देतात. यावर मतदारांचा विश्वास ठरतो.फ पक्ष कार्यकर्त्यांनी स्वत:ची प्रतिमा स्वच्छ ठेवावी. ङ्गजर कुणी माझ्या नावाचा गैरवापर करत असेल तर आम्ही ते नक्कीच पाहू. तसेच एखादी महिला कामासाठी आली तर तिला मदत होईल असा विश्वास असावा,फ असेही ते म्हणाले. अधिकाऱ्यांबाबत बोलताना अजित पवारांनी ठाम भूमिका घेतली. ङ्गतुम्ही योग्य काम घेऊन आलात आणि अधिकारी टाळाटाळ करत असतील तर मला कळवा. मग त्यांना कोणत्या भाषेत बोलायचं ते मी ठरवेन. पण प्रशासनाचा सन्मान राखला पाहिजे कारण ते जनतेचे सेवक आहेत,फ असे त्यांनी सांगितले. आगामी निवडणुकांकडे लक्ष वेधून त्यांनी कार्यकर्त्यांना सूचना केल्या की, ङ्गचांगले कार्यकर्ते हेरले पाहिजेत. अनेकदा काही कार्यकर्ते पुढे पुढे करतात पण निवडणुकीत ५० मतदेखील मिळवत नाहीत. त्यामुळे खऱ्या अर्थाने पक्षवाढ करणाऱ्या लोकांवर भर द्यायला हवा.फ गोंदिया-भंडारा सहकारी निवडणुकीत अनेक उमेदवार विजयी झाले असल्याचे नमूद करून अजित पवारांनी समाधान व्यक्त केले. मात्र, काही पदाधिकारी पदाचा वापर पक्षवाढीसाठी न करता व्यक्तिगत फायद्यासाठी करतात, अशा तक्रारी आल्याचे त्यांनी सांगितले आणि त्यावर लक्ष ठेवले जाईल, असेही त्यांनी कार्यकर्त्यांना आश्वस्त केले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# .....जीवावर उठलेली भूतदया.....

## संपादकीय लेख

सर्व भटक्या कुत्र्यांना पकडून निवारा केंद्रात ठेवण्याबाबत दिलेल्या मागील आदेशात सर्वोच्च न्यायालयाने काही प्रमाणात केलेली सुधारणा व्यावहारिक असली, त्यामुळे मूळ प्रश्न सुटेलच असे नाही. या संदर्भात राष्ट्रीय धोरण तयार करण्याचा निर्देश न्यायालयाने दिल्याने या प्रश्नातून नेमका कसा मार्ग काढावा, याबाबत भविष्यात स्पष्टता येऊ शकते. काही दिवसांपूर्वीच न्यायालयाने ङ्गसर्व भटक्या कुत्र्यांना निवारागृहांत ठेवावे,फ असा आदेश दिला. त्याची अंमलबजावणी कशी करायची, या चिंतेने संबंधित यंत्रणा हबकल्या होत्या; तसेच श्वानप्रेमींनीही हा आदेश ङ्गअमानवीफ आणि ङ्गअवैज्ञानिकफ असल्याची टीका करून आंदोलनेही केली होती. दिल्लीतील आणि राष्ट्रीय राजधानीचा परिसर असलेल्या ङ्गएनसीआरफमधील सुमारे सहा लाख कुत्र्यांना ठेवण्याइतकी निवारागृहे आहेत का, त्यांना सांभाळण्यासाठी शेकडो कर्मचारी-पशुवैद्यक आणि निधी आहे का आणि एवढ्या कुत्र्यांना एकत्र ठेवणे शक्य आहे का, असे अनेक प्रश्न त्यातून उभे राहिले होते. सुधारित आदेशात न्यायालयाने भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी काही उपाय सुचविले आहेत. या भटक्या कुत्र्यांना पकडल्यानंतर त्यांची नसबंदी- लसीकरण करून त्यांना मूळ जागी सोडावे, हा त्यातील महत्त्वाचा भाग आहे. त्याबरोबरच पकडलेल्या कुत्र्यांपैकी रेबीजची लागण झालेल्या किंवा आक्रमक कुत्र्यांना मात्र निवारागृहांतच ठेवण्यात यावे, असेही न्यायालयाने बजावले; तसेच रस्त्यांवर कुत्र्यांना अन्न खायला देऊ नये, त्यासाठी जागा निश्चित कराव्यात आणि त्यांचे उल्लंघन केल्यास गुन्हा दाखल करावा, असे सांगून जबाबदार श्वानप्रेमाचा गेल्या वर्षभरात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्याच्या सुमारे ३७ लाख घटना घडल्या असून, त्यापैकी पाच लाख घटनांमध्ये लहान मुलांवर हल्ले झाले आहेत. दरवर्षी ङ्ग रेबीज ममुळे सुमारे १८ ते २० हजार जणांचा बळी जातो; त्यापैकी ९० टक्के घटना कुत्री चावल्याने घडतात, असे देशातील आकडेवारी सांगते. विशेषतः ङ्गरेबीजफमुळे जगभरात जाणाऱ्या बळींमध्ये ३६ टक्के प्रमाण केवळ भारतामध्ये असल्याचे सांगून जागतिक आरोग्य संघटनेने या विषयाचे गांभीर्य ओधोरेखित केले आहे. देशात भटक्या कुत्र्यांची संख्या पाच कोटींच्या घरात असल्याचा एक अंदाज असून दिल्ली एनसीआरमध्ये त्यांची संख्या सहा लाख इतकी आहे. डोसही दिला आहे कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्यू-जखमी होण्याबरोबरच रात्री अपरात्री कुत्र्यांच्या झुंडीने अचानक हल्ला केल्याने दुचाकीस्वारांच्या अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. प्रामुख्याने ङ्गप्रीव्हेन्शन ऑफ क्रुएल्टी टू ॲनिमल(१९६१)फ आणि ङ्गॲनिमल बर्थ कंट्रोल (डॉग) (२००१)म या कायद्यांतील तरतुदींच्या आधारे भटक्या कुत्र्यांच्या विषयाचे नियमन केले जाते. त्यातील तरतुदींनुसार कुत्र्यांसह प्राण्यांना मारहाण करणे, हा गुन्हा आहे. या कुत्र्यांची नसबंदी



आणि लसीकरण करून पुन्हा त्याच परिसरात सोडण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर टाकण्यात आली आहे. या अंमलबजावणीतच या प्रश्नावरील उपाययोजनांचा फार्स सुरू होतो. भटक्या कुत्र्यांना पकडण्यापासून त्यांची नसबंदी आणि लसीकरणासाठी या स्थानिक स्वराज्य संस्थांचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. त्यांच्याकडे पुरेसे पशुवैद्यक नाहीत, निवारा-उपचार केंद्रांची वानवा आहे आणि लशींचा साठाही नसतो. श्वानदंशाच्या घटनांबाबत आरडाओरडा झाल्यावर तोंडदेखली कारवाई करण्यात येते; इतर वेळी नसबंदीच्या आकडेवारीचे केवळ कागद रंगवले जातात. त्यामुळे भटक्या कुत्र्यांची संख्या वाढतच राहते, ही वस्तुस्थिती आहे. शहरातील कचऱ्याचे ढीग, रात्री हॉटेल किंवा खाद्यपदार्थांचा कचरा रस्त्याच्या कडेला सर्रास टाकण्याच्या प्रकारांतून या कुत्र्यांची संख्या वाढत जाते. या कुत्र्यांची नसबंदी करून त्यांना भलतीकडे अनोळखी भागांत सोडले, तर ही कुत्री हिंसक होतात आणि नवी कुत्री मूळ जागी येऊन प्रश्न कायम राहतो. भटकी आणि पाळीव कुत्रीदेखील रस्त्यांवर किंवा सार्वजनिक ठिकाणी मलमूत्र विसर्जन करतात, त्यातून अस्वच्छता-रोगराईला निमंत्रण मिळते. भूतानसारख्या देशात शंभर टक्के भटक्या कुत्र्यांच्या नसबंदीची उद्दिष्टपूर्ती झाल्याने हा प्रश्न सुसह्य झाल्याच आढळून येते. भारतातील कुत्र्यांचा प्रश्न तेवढा सोपा नसला, तरी नवे धोरण ठरविताना इतर देशांतील परिस्थिती, कायदे आणि उपाययोजनांचाही अभ्यास गरजेचा असून, स्थानिक स्वराज्य संस्थांना या कामासाठी मनुष्यबळ आणि निधीची आवश्यकता आहे. सातत्यपूर्ण उपाययोजनांतूनच क्रौर्य किंवा प्राणिप्रेम यांपैकी कोणतेही टोक न गाठता माणसांची सुरक्षा आणि भूतदया यांच्यात संतुलन साधून मार्ग काढावा लागेल .




## वाढीव आलेली विज बिले कमी करण्यासाठी अक्षय पाटील यांनी गाठले महावितरण कार्यालय....!

**जनसंचलन/जळगाव जा.** तालुक्यातील अनेक ग्राहकांना महावितरण कंपनीने अव्वाच्या-सव्वा बिले दिली सदर विज बिले ही रिडींगला धरून नसुन निव्वळ ग्राहकांची लुटमार असल्याचे दिसत आहे.



वाढीव बिले कमी करावी यासाठी ग्राहकांनी महावितरण कार्यालयाकडे खुप वेळेस लेखी तक्रारी केल्या मात्र अधिकारी ऐकुन घ्यायच्या तयारीत नसल्याचे दिसुन येते.

त्यामुळे त्रस्त झालेल्या काही ग्राहकांनी युवा आंदोलक अक्षय पाटील यांना सर्व विषय सांगितला असता त्यांनी तात्काळ महावितरण कार्यालय जळगाव जामोद चे उपकार्यकारी अभियंता चौबारावाला साहेब यांच्या कडे जाऊन आलेल्या सर्व समस्या सांगितल्या व सविस्तर चर्चा केली यासोबतच कार्यकारी अभियंता तायडे साहेब मलकापुर यांच्याशी सुद्धा दूरध्वनीवरून चर्चा केली.

त्यानंतर ज्या ग्राहकांनी महावितरण कडे तक्रारी केलेल्या आहेत त्यांची वाढीव विज बिले कमी केले नाही तर महावितरण कार्यालयामध्ये आंदोलन करण्यात येईल असा इशारा आज दिनांक २५/८/२०२५ ला उपकार्यकारी अभियंता यांना याप्रसंगीदेण्यातआला.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# महाविकास आघाडीचे पक्ष आगामी निवडणुका स्वतंत्र लढणार?

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचं सूचक वक्तव्य

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगलं यश आलं. पण त्यानंतर पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. यानंतर आता राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुकांसाठी राज्यभरात प्रत्येक पक्षाकडून तयारी केली जात आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीतील घटक पक्ष एकत्र निवडणूक लढवणार नसल्याचे संकेत मिळत आहेत. कारण काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी तसे संकेत दिले



आहेत. त्यामुळे आगामी काळात महाविकास आघाडीत काय-काय घडतं ते पाहणं महत्त्वाचं आहेस्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राज्य पातळीवर कोणत्याही प्रकारची आघाडी केली जाणार नाही. आघाडीचे अधिकार स्थानिक पातळीवर देण्यात आले आहेत. महाविकास आघाडीच्या घटक पक्षांशी शहर, तालुका, जिल्हा पातळीवर चर्चा करावी. स्थानिक पातळीवर एकमत होत असेल, तर आघाडी करावी, असे धोरण ठरविले आहेङ्क, अशी माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सोमवारी पत्रकारांना दिली.छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि धाराशिव जिल्ह्यांसाठी काँग्रेसच्या मराठवाडास्तरीय पदाधिकाऱ्यांची विभागीय बैठक सोमवारी झाली.
माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आमदार अमित देशमुख, विश्वजित कदम, ज्येष्ठ नेते मधुकरराव चव्हाण, खासदार डॉ. कल्याण काळे, राष्ट्रीय सचिव कुणाल चौधरी, सेवादल प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर, शहराध्यक्ष शेख युसूफ आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पहिली आढावा बैठक आज झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कार्यकर्ता मजबूत करण्याकडे आम्ही वाटचाल करत आहोत. भारतीय जनता पक्ष लोकशाही विरोधी आहेङ्क, अशी टीका हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. ङ्कलाडकी बहीण योजनेत महायुती सरकारने महिलांची फसवणूक केली आहे, तीन हजार रुपये देवू, असे सांगून दीड हजार रुपये देत आहेत. लाभ देताना बोगस अर्ज मंजूर करण्यात आले.
अशा लाभार्थ्यांना वाटप झालेली रक्कम ही संबंधित अधिकाऱ्यांच्या पगारातून वसूल करावी, त्यांना तत्काळ सेवेतून बडतर्फ करावेङ्क, अशी मागणी सपकाळ यांनी केली.

# दुसरीही मुलगीच झाली, आईने पोटच्या लेकीला पाण्यात बुडवून संपवलं, रत्नागिरीतील भयंकर घटना

**रत्नागिरी:** पहिली मुलगी होती दुसरीही मुलगीच झाल्याने पती घरी नसल्याची संधी पाहून आपल्या पोटच्या मुलीलाच पाण्याचा बालदीत उपडी बुडवून खून केल्याची खळबळजनक घटना घडली होती. जिल्हा हादरवून टाकणारी ही घटना ५ मार्च २०२१ रोजी घडली होती त्यानंतर ती मी नव्हेच हा बनाव करणाऱ्या महिलेवर तपासाअंती अखेर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी या महिलेला चिपळूण जिल्हा व सत्र न्यायाधीश चिपळूण जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. अनिता नेवसे यांनी आज जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. चिपळूण तालुक्यात ही दुर्दैवी घटना घडली होती. ५ मार्च २०२१ रोजी तिचे पती रत्नागिरी येथे गेलेले असताना दुपारच्या सुमारास तिने तिच्या एक महिन्याच्या मुलीस घरातील पाण्याने भरलेल्या बादलीत डोके खाली पाय वर अशा स्थितीत ठेवून तिचा खून केला व शेजारचे लोक गोळा झाल्यावर बेशुध्द पडल्याचे नाटक करुन ङ्गती मी नव्हेचफ असा बेबनाव केला. या गुन्ह्यातील आरोपी शिल्पा प्रविण खापले ही तिच्या दोन लहान मुली, नवरा व सासू-सासरे यांच्या सोबत चिपळूण तालुक्यातील वहाळ, घडशीवाडी येथे राहत होती. आरोपी शिल्पा हिला दोन्ही मुलीच होत्या. आरोपीला दुसऱ्या वेळी मुलगा व्हावा अशी तीव्र इच्छा होती परंतु, दुसऱ्या वेळी देखील मुलगीच झाल्यामुळे ती नाराज होती. सुरुवातीला सावर्डे पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी आस्कमिक मृत्यू नोंद करुन चौकशी केली. परंतु, गुन्ह्याची सर्व परिस्थिती व एकूण पार्श्वभूमी विचारात घेवून मुलीचा खूनच झाला आहे असे निष्पन्न झाल्यामुळे भा.द. वि. कलम ३०२ अन्वये सुरुवातीस अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. परंतु पोलीस उपअधिक्षक सचिन बारी यांनी या गुन्ह्याचा सखोल तपास करुन आरोपी माता शिल्पा प्रविण खापले हिनेच खून केल्याचे तपासाअंती निष्पन्न केले. तिच्या विरुध्द आरोपपत्र दाखल केले,या प्रकरणात तिच्यावरती खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.या खटल्याची सुनावणी चिपळूण येथील जिल्हा न्यायाधीश डॉ. अनिता श्रीरंग नेवसे यांच्या समोर झाली. सरकार पक्षातर्फे अड. अनुपमा ठाकुर यांनी आरोपीचा गुन्हा शाबित करण्याकरिता एकूण १५ साक्षीदार तपासले. आरोपीचे दुष्कृत्य म्हणजेच एक महिन्याच्या बाळाला मुलाच्या हव्यासापोटी पाण्याने भरलेल्या बादलीमध्ये बुडवून ठार मारुन बेबनाव करणे. या बाबी शाबित करण्यासाठी मा. सर्वोच्च व मा. उच्च न्यायालयाचे विविध न्यायनिवाडे सादर केले. अभिलेखावरील सरकार पक्षाचा एकंदरीत साक्षीपुरावा, वैद्यकीय अधिकारी, पोलीस अधिकारी, शेजारी राहणा-या साक्षीदारांनी दिलेली महत्वपूर्ण साक्ष व सखोल युक्तीवाद ग्राह्य धरुन सत्र न्यायाधीश डॉ. अनिता श्रीरंग नेवसे यांनी आरोपीस दोषी धरले व भा.द.वि कलम ३०२ अन्वये आजन्म कारावास व २५ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली.या केसमध्ये सरकारी वकील म्हणून




श्रीमती ठाकुर यांनी काम पाहिले. तसेच पोलीस उपअधिक्षक श्री. बारी यांनी गुन्ह्याचा सखोल तपास करुन आरोपीविरुध्द आरोपपत्र दाखल केले. या केसकामी कोर्ट पैरवी पोलीस कॉन्स्टेबल म्हणून श्री. कांबळे यांनी काम पाहिले. न्यायालयाने न्यायनिर्णय देताना मुलींबाबतचा सामाजिक दृष्टीकोन विचारात घेवून ङ्कबेटी बचाओ बेटी पढाओफ तसेच संविधानाने बालिकांना दिलेले घटनात्मक अधिकार याचा उल्लेख केला. आरोपी एक महिला असून तिने मुलाच्या हव्यासापोटी स्वतःच्याच मुलीचा खून केल्यामुळे आरोपी महिलेस कठोर शिक्षा देवून स्त्री-पुरुष समानतेबाबतचा संदेश या न्यायनिवाड्यातून दिला.

अतिरिक्त सत्र न्यायालय चिपळूण येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. अनिता एस. नेवसे यांनी आज एक महिन्याच्या बालिकेच्या खून प्रकरणी आरोपी मातेस भा.द.वि कलम ३०२या गुन्ह्याखाली दोषी धरून तिला आजन्म कारावास व २५ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राज ठाकरेंच्या भेटीसाठी अक्षरशः तरसले, पण पक्षाकडून हकालपट्टी, वैभव खेडेकरांनी मांडली कैफियत





**रत्नागिरी :** मनसेचे खेडचे माजी नगराध्यक्ष वैभव खेडेकर यांची पक्षातून हकालपट्टी झाली आहे. वैभव खेडेकर यांनी या कारवाईनंतर पत्रकार परिषद घेत भूमिका मांडली आहे. ङ्खमाझ्या या आजच्या बडतर्फीच्या कारणीमांसा जर मी केली, तर मला असं कळलं की, मी भाजपच्या काही नेत्यांना भेटलो होतो म्हणून माझा पक्षप्रवेश त्या पक्षात होतो काय, अशा पद्धतीची भावना निर्माण झाली, त्यातून माझी हकालपट्टी झाली आहे. खरंतर असा कोणताही हेतू माझ्या मनात नव्हताङ्खङ्ख, असं वैभव खेडेकर म्हणाले.ङ्खङ्खमी काल कोकणातले मंत्री नितेश राणे यांना भेटलो. हे सत्य आहे. त्याला कारणही तसंच आहे. आमच्या पुण्यामधील माझे सहकारी गणेश पाटील, तिथल्या राजकीय परिस्थितीमुळे त्यांची तडपारी काढली होती. त्यांना गणेशोत्सवात जेलमध्ये टाकणार होते. ती तडीपारी रद्द करण्यासा संदर्भात मी नितेश राणे यांची भेट घेतली. त्यांनी तात्काळ तिथल्या एसपी आणि आयजींना फोन करुन ती तळीपारी थांबवा, अशा पद्धतीची त्यांना विनंती केली किंवा सांगितलं. आज त्यांची तडीपारी थांबली आहे. हे तुम्ही गणेश पाटील यांना विचारु शकताङ्खङ्ख, असं स्पष्टीकरण वैभव खेडेकर यांनी दिलं.अशी अनेक काम, जी मंत्रालय स्तरावरची असतात. ती पक्षाची सत्ता नसल्या कारणाने त्या त्या खात्याच्या मंत्रांना भेटावं आणि आपल्या पक्षाचं काम करावं ही माझी सातत्याने भूमिका राहिलेली आहे. त्यामुळे मी आपल्या कार्यकर्त्यांना परस्पर घेऊन जात असतो. तिथली कामं करुन घेतली आहे. मी विकासकामांबाबत सातत्याने मंत्रालयात भेटत राहिलेलो आहे. कारण आपली एकमेव नगरपालिका होती जी विरोधात होती. त्यामुळे विकासासाठी सत्ताधाऱ्यांना भेटणं अपेक्षित होतं. या संदर्भात गैरसमज निर्माण झाले असावेत असं मला वाटतंङ्खङ्ख, असंदेखील स्पष्टीकरण त्यांनी केलं. गेल्या दोन महिन्यांपासून मी या सर्व गोष्टींचा खुलासा करण्यासाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेण्यासाठी वेळ मागत होतो. मी पक्षातील अनेक नेत्यांना फोन केला. अनेक नेत्यांना भेटलो. मी विनंती आणि आर्जव करत होतो की, राज ठाकरेंची भेट करुन द्या. पण दोन महिन्यात मला राज ठाकरेंची भेट मिळाली नाही. हे दुर्दैव आहे. कोकणात अनेक समस्या आहेत. त्यांचा खुलासा व्हायला पाहिजेङ्खङ्ख, असं वैभव खेडेकर म्हणाले.मला बडतर्फ केल्याच्या पत्रावर मनसे नेते संदीप देशपांडे आणि अविनाश जाधव यांची स्वाक्षरी आहे. मी त्यांच्याच भेटीसाठी नेहमी जात होतो. ते देखील राज ठाकरे यांची भेट घडवून देण्यासाठी प्रयत्न करत होते. साहेब तुला मेळाव्यात भेटतील, असं त्यांनी सांगितलं होतं. तरीही मी वाट पाहिली. पण मला आजतागायत त्याला यश आलं नाही. राज ठाकरे यांनी पत्र काढलं आहे. पत्रात म्हटलं आहे की, पक्षाच्या धोरणांचं उल्लंघन केलं. पण मला अजून कळत नाही की, मी पक्षविरोधी काय भूमिका घेतली? पक्षाविरोधात मी काय काम केलं?ङ्खङ्ख, असा सवाल वैभव खेडेकर यांनी केला.मी कधीच पक्षाच्या चौकटीबाहेर काम केलं नाही. माझा प्रवास हा शिवसेना ते मनसे असा ३० वर्षांचा आहे. मी पक्ष वाढीसाठी दोन-दोन मंत्र्यांना अंगावर घेतलं. त्यांच्याशी वैर घेतलं. जेलवाऱ्या केल्या. मला नगराध्यक्ष असताना ६ वर्षांसाठी निलंबित केलं गेलं. मनसे पक्षात असल्यामुळेच मला निलंबित केलं गेलंङ्खङ्ख, असं वैभव खेडेकर म्हणाले.

## महायुतीत फूट? भाजपने युती धर्म पाळला नाही.. पुण्यातील प्रभाग रचनेवर राष्ट्रवादीनंतर शिवसेनेचीही जाहीर नाराजी



**पुणे:** पुणे महापालिका निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना जाहीर झाली आहे. यामध्ये पुण्यात १६५ नगरसेवक असणार आहेत तर ४ सदस्यांचे ४० प्रभाग आणि १ प्रभाग ५ सदस्यीय असणार आहे. मात्र प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर विरोधकचं नाही तर महायुतीतील मित्रपक्ष सुद्धा भाजपवर नाराज आहेत. वास्तविक पाहता प्रशासनाने करायच्या प्रभाग रचनेत भारतीय जनता पक्षाचा हस्तक्षेप असल्याची टीका सर्वच राजकीय पक्षांनी केली आहे. आधी अजित पवारांच्या राष्ट्रवादीने उघड नाराजी व्यक्त केली त्यानंतर आता एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने सुद्धा भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. लोकसभा विधानसभेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी असेल शिवसेना असेल किंवा इतर घटक पक्ष आणि सर्वांनी मिळून निवडणुका लढवल्या होत्या. त्यावेळी सर्वांना बोलावलं जात होतं. परंतु ज्यावेळेस पुणे महापालिकेच्या प्रभाग रचनेचा विषय आला त्यावेळेस त्यांनी कोणालाच विचारात घेतलं नाही. त्यामुळे आम्ही नाराज आहोत, असं शिवसेनेचे शहराध्यक्ष नाना भानगिरे म्हणाले आहेत.मात्र, महायुती म्हणून आम्ही लढण्यास तयार आहोत. पण, आमचे वरिष्ठ जे निर्णय घेतील त्यानुसारच पुण्यात काम होईल. प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा जाहीर झाल्यानंतर आमची एक बैठक झाली. त्यामध्ये कार्यकर्त्यांना तयारीला लागायच्या सूचना आम्ही दिल्या आहेत. महायुतीमध्ये निवडणुका लढवायच्या असतील तर आम्हाला ३५ ते ४० जागा द्याव्यात त्यानुसार आमचं काम सुरू झालं आहे. सर्व ४१ प्रभागांमध्ये कार्यकर्त्यांनी काम सुरू केला आहे. प्रभाग रचनेमध्ये भाजपने युतीधर्म पाळला नाही त्यांनी आम्हाला बोलवायला हवं होतं मात्र तसं त्यांनी केलं नाही त्यामुळे आम्ही नाराज आहोत. असं देखील भानगिरे म्हणाले आहेत.भाजपने महायुती धर्म पाळला पाहिजे शिवसेनेला फायदा होईल की नाही माहिती नाही पण राष्ट्रवादीला फटका बसेल आम्ही यावर हरकत घेणार आहोत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी यावर चर्चा करणार आहोत. महायुतीमध्ये पुण्यात प्रभाग रचनेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नाराज आहे. पुण्यातील मध्यवर्ती प्रभाग जैसे थे उपनगरांत मात्र मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. अशी भूमिका राष्ट्रवादीने घेतली आहे. त्यामुळे महायुतीतील दोनही घटक पक्ष भाजपवर नाराज असल्याने पुणे महापलिका निवडणुकीच्या तोंडावर महायुती फुटीच्या उंबरठ्यावर असल्याचं बोललं जात आहे

## काँग्रेसला भगदाड, राहुल पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश



**कोल्हापूर :** काँग्रेसचे दिवंगत आमदार पी. एन. पाटील यांचे पुत्र राहुल पाटील आणि त्यांच्या गटाने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत कोल्हापुरातील सडोली खालसा या ठिकाणी भव्य पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी बोलताना राहुल पाटील यांच्या पक्षप्रवेशामुळे कोल्हापुरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढणार असल्याचा विश्वास पक्षप्रमुख अजित पवार यांनी व्यक्त केला आहे. अजित पवार यांनी राहुल पाटील यांचा पक्षप्रवेश करण्याचा योग्य निर्णय असल्याचे सांगितलं. ते म्हणाले, पी. एन. पाटील साहेब आपल्या सर्वांना सोडून गेले. पण त्यांचे विचार आणि कार्य आम्ही पुढे नेत आहोत. राहुल पाटील यांनी घेतलेल्या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद कोल्हापूर जिल्ह्यात नक्की वाढेल.राहुल पाटील देखील भाषणात बोलताना आपल्या वडिलांच्या स्मृतींना उजाळा देत म्हणाले की, पी. एन पाटील साहेबांनी ज्या निष्ठेने काम केलं त्याच निष्ठेनं आम्ही राष्ट्रवादीसोबत प्रामाणिकपणे पुढे जात आहोत. त्यामुळे सगळी जनता देखील तशाच प्रेमाने आणि त्याच ताकदीने सोबत राहील. असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तसेच, पी. एन. पाटील साहेबांचं निधन झाल्यानंतर काँग्रेसच्या नेत्यांना सांत्वनालाही वेळ मिळाला नाही. मात्र, अजित पवारांनी घरी येवून सांत्वन केलं, अशी खदखदही राहुल पाटलांनी बोलून दाखवली.अजित पवार म्हणाले, बाभूळगाव आणि सडोली खालसा यांचे जुने राजकीय संबंध महाराष्ट्राने पाहिलेत, आता सडोली खालसा आणि काटेवाडी यांचं नवं नातंच संपूर्ण महाराष्ट्र पाहणार आहे. तर याचा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर मोठा परिणाम होणार असल्याचा विश्वास देखील अजितदादांनी दाखवला आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विवाहित लेकीसह प्रियकराला संपवलं, बॉडी विहिरीत फेकल्या; ऑनर किलिंगच्या घटनेने नांदेड हादरलं



**नांदेड:** ऑनर किलिंगच्या घटनेने नांदेड हादरलं आहे. पित्याने आपल्या पोटच्या मुलीची आणि तिच्या प्रियकराची हत्या करून मृतदेह चाळीस फूट खोल आणि वीस ते तीस फूट पाणी असलेल्या विहरीत फेकले. धक्कादायक म्हणजे हत्याकरून आरोपी स्वतः हून पोलिस ठाण्यात हजर होऊन घटनेची माहिती दिली. जिल्ह्यातील उमरी तालुक्यातील गोळेगाव येथे ही धक्कादायक सोमवारी (२५ ऑगस्ट) सायंकाळी घटना उघडकीस आली आहे. पोलिसांनी गावकऱ्यांच्या मदतीने मुलीचा मृतदेह विहरीतून बाहेर काढला, तर मुलाचा शोध सुरुच होता. संजीवणी कमळे (वय १९ वर्ष ) आणि लखन बालाजी भंडारे (वय १९) अशी मयतांची नावे आहेत. दरम्यान या ऑनर किलिंगच्या घटनेने खळबळ उडाली आहे.मयत संजीवनी सुरने ही उमरी तालुक्यातील बोरजुन्नी येथील रहिवासी आहे. एक वर्षापूर्वी गोळेगाव येथील सुधाकर कमळे या मुलासोबत तिचा विवाह झाला होता. कुटुंबियांनी मोठ्या थाटात विवाह केला होता. विवाहापूर्वी संजीवनीचा लखन भंडारे या तरुणासोबत प्रेम प्रकरण सुरु होते. लग्नानंतर ही दोघांमध्ये फोनवर बोलणे सुरु होते. सोमवारी सासरचे मंडळी बाहेर गेल्याने संजीवनी हिने आपल्या प्रियकराला घरी बोलवलं. अचानक घरी परतलेल्या पती आणि सासरच्या मंडळींनी दोघांना नको त्या अवस्थेत बघितलं.

त्यानंतर संजीवनीच्या पतीने सासरा मारोती सुरने यांना फोन करून बोलावले आणि मुलीला घरी घेऊन जाण्यास सांगितले.मुलीचे वडील मारोती सुरणे, काका माधव सुरणे आणि आजोबा लक्ष्मण सुरणे हे तिघेजण मुलीच्या सासरी गोळेगाव पोहचले. गोळेगाव आणि बोरजुन्नी हे आजू बाजूला गावं आहे. पानंद रस्त्यातून या गावाला ये-जा करावं लागतं. आरोपींनी मुलीला आणि तिच्या प्रियकराला घेऊन जात असताना करकाळा शिवारात दोघांना मारहाण करून त्यांची हत्या केली. त्यानंतर चाळीस फूट खोल असलेल्या विहरीत दोघांचे मृतदेह फेकून दिले.घटनेनंतर सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास मुलीचे वडील मारोती सुरणे हे उमरी पोलिस ठाण्यात पोहचून मी मुलीला आणि तिच्या प्रियकराला मारून विहरीत फेकले अशी माहिती दिली. माहिती ऐकताच पोलिस देखील चक्रावून गेले. दरम्यान, पोलिस आरोपीला घेऊन घटनास्थळी पोहचले. सायंकाळी सात वाजता मुलीचे प्रेत बाहेर काढण्यात आले तर प्रेमी मुलाच्या प्रेताचा शोध सुरूच आहे. दरम्यान, सदर घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलिस आधिक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलिस आधिकारी दशरथ पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली. यावेळी उमरी पो स्टे चे सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश माने यांनी घटनास्थळीचा पंचनामा केला. या प्रकरणी उमरी पोलीस ठाण्यात मुलीचे आजोबा लक्ष्मण सुरणे, वडिल मारोती सुरणे आणि काका माधव सुरणे या तिघांना ताब्यात घेतले. ऑनर किलिंगच्या घटनेने खळबळ उडाली आहे.

## दोन गटात तुफान राडा, धारधार शस्त्रे उपसली, तलवारी अन्... छत्रपती संभाजीनगरात तणाव

**छत्रपती संभाजीनगर:** शहरातील राजा बाजार कुंवारफल्ली परिसरामध्ये जुन्यावादातून दोन गट आमने-सामने आले. दोघांमध्ये तुफान हाणामारी झाली. यातील काही तरुणांना थेट धारदार शस्त्र उपसली. ज्यामध्ये तलवारींचा देखील समावेश होता. यामुळे परिसरात काही काळ तणावाच वातावरण निर्माण झालं होतं. पोलिसांना माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. मात्र, घटनास्थळावरून आरोपी पसार झाले. एक तलवार ताब्यात घेतल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. हा संपूर्ण प्रकार शनिवारी मध्यरात्री घडला.छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती भाग म्हणून राजाबाजार कुंवारफल्ली याला ओळखलं जातं. गेल्या काही दिवसांपासून या भागातील दोन गट सातत्याने समोरासमोर येत आहे. जुन्या वादातून या दोन्ही गटांमध्ये संघर्ष सुरू आहे. दरम्यान, शनिवारी रात्री दोन वाजेच्या सुमारास जुन्या वादाच्या कारणावरून हे दोन्ही गट पुन्हा आमने-सामने आले. दोन्ही गटातील कार्यकर्त्यांनी एकमेकांना शिवीगाळ केली. त्यानंतर थेट लाठ्या-काठ्याने मारहाण सुरु झाली.एका गटातील तरुण एवढ्यावरच थांबले नाही तर त्यांनी थेट धारदार शस्त्र बाहेर काढली. यामध्ये तलवारीचा देखील समावेश होता. यामुळे परिसरातील वातावरण तणावाच झालं होतं. काही स्थानिकांनी ही माहिती तात्काळ सिटी चौक पोलिसांना दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता सिटी पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अधिकारी कर्मचाऱ्यांनी तरुणांना धरपकड कार्याला सुरुवात करताच गोंधळ घालणारे तरुण घटनास्थळावरून पसार झाले. त्यामुळे पोलिसांच्या हाती कुणीच लागलं नाही. स्थानिकांनी पोलिसांना शस्त्राचा वापर झाल्याची माहिती दिल्यानंतर पोलिसांनी शोधाशोध केली. एकापेक्षा अधिक तलवारी या गोंधळात काढण्यात आल्या होत्या. मात्र, पोलिसांच्या हाती फक्त एकच तलवार लागली. राडा करणारे तरुण घटनास्थळावरून प्रसार झाले. सध्या पोलिस आरोपीचा शोध घेत आहेत. गेल्या काही दिवसांपासून शहरांमध्ये किरकोळ कारणावरून मोठे वाद होत आहे. या वादात अल्पवयीन मुलांसह तरुण धारदार शस्त्र बाहेर काढत आहे. अनेक घटनांमध्ये नागरिकांना भोसलेच्या देखील घटना उघडकीस आले आहे. सातत्याने वाढत जाणारी ही गुन्हेगारी आता तरी पोलिस थांबवणार का असाच प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.

## एकनाथ शिंदे यांच्या रॅलीवेळी शिवसैनिकांचा मोठा गोंधळ, पोलिसांकडून सौम्य लाठीचार्ज

**अहिल्यानगर :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज संगमनेर दौऱ्यावर आहेत. एकनाथ शिंदे यांची आज संगमनेरमध्ये जंगी रॅली निघाली. या रॅलीनंतर त्यांची सभादेखील आयोजित करण्यात आली. पण त्यांच्या रॅलीदरम्यान काही शिवसैनिकांनी मोठा गोंधळ घातला.
विशेष म्हणजे यावेळी गोंधळावर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला आहे. या घटनेचा व्हिडीओ देखील समोर आला आहे.या घटनेतून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या रॅलीदरम्यान पोलिसांचं नियोजन कोलमडल्याचं पाहायला मिळालं आहे. एकनाथ शिंदे यांच्या सभास्थळी मंचाजवळ



कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला. हा गोंधळ अचानक वाढत गेला. यामुळे यावळी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नगरविकास खात्यावर फडणवीस नाराज, बैठकीला शिंदेंची दांडी, महायुतीत नाराजीनाट्य ?






**मुंबई :** महायुतीत सारं काही आलबेल आहे का? असा प्रश्न पुन्हा पडताना दिसतोय. कारण यावेळी आता थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात नाराजी नाट्याची चर्चा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या खात्यामधील अधिकाऱ्यांवर नाराज असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच देवेंद्र फडणवीस यांनी नगरविकास विभागाच्या अधिकाऱ्यांची खरडपट्टी घेतल्याचं वृत्त एका वृत्तवाहिनीने सूत्रांच्या हवाल्याने दिलं आहे. नगरविकास खात्याकडून केंद्र सरकार पैसा पुरवत असलेल्या योजना प्रभावितपणे राबवल्या जात नसल्याचा मुख्यमंत्र्यांचा आरोप आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी सह्याद्री अतिथीगृह येथे नगरविकास खात्याची बैठक घेतली होती. या बैठकीत एकनाथ शिंदे उपस्थित नव्हते. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढली. या बैठकीत प्रोटोकॉलनुसार एकनाथ शिंदे उपस्थित असायला हवे होते. तसेच त्यांनी स्वत:हून नगरविकास खातं मागून घेतलं होतं. तरीही मुख्यमंत्र्यांनी बोलावलेल्या बैठकीत शिंदे यांनी दांडी मारल्यामुळे ते समाधानी नाहीत का? असा प्रश्न उपस्थित होतोय. यातून त्यांच्या नाराजीच्या चर्चांनी जोर धरला आहे.या नाराजी नाट्याबाबत एकनाथ शिंदे यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला पण त्यांनी उत्तर देणं टाळलं आहे. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी महायुतीचं काम सुरु असल्याचं एकनाथ शिंदे म्हणाले आहेत. ङ्कङ्कअडीच वर्षांचं सरकार तुम्ही पाहिलेलं आहे. महायुतीची दुसरी इनिंग सुरु झाली आहे. यापूर्वीची पहिली इनिंग तुम्ही पाहिलेली आहे. विकासाच्या मुद्द्यालाच आम्ही पुढे घेऊन गेलो आहेत. महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास कसा होईल यासाठी आमची टीम काम करत आहेङ्कङ्क, असं एकनाथ शिंदे म्हणाले आहेत.केंद्राच्या अमृत योजनेच्या अंमलबजावणीत विलंब बोत असल्याचा मुख्यमंत्र्यांचं म्हणणं आहे. तसेच यामुळे त्यांनी अधकाऱ्यांच्या बैठकीत नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे. केंद्राकडून मिळालेल्या निधीचा पूर्ण उपयोग करा, अशा सूचना देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मी आणि एकनाथ शिंदे काय उत्तर देणार? असा सवाल देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना केला.दरम्यान, या वृत्तावर विरोधकांकडून टीका केली जात आहे. खासदार संजय राऊत यांनी शिंदेंवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. ङ्कङ्कएकनाथ शिंदे हे नगरविकास मंत्री म्हणून पूर्णपणे अपयशी आहेत. नगरविकास खात्यातून मग एमएमआरडीए असेल, काही प्रकल्प असतील, नगरपालिका, महापालिका यांचा निधी केंद्रातून आला असेल आणि त्यांनी तो निधी इतरत्र वळवला असेल, ठेकेदारांच्या माध्यमातून कमिशनगिरी केली असेल तर हा भ्रष्टाचार आहे. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना बडतर्फ केलं पाहिजेङ्कङ्क, असं संजय राऊत म्हणाले.

# ओव्हरटेक करताना दुपट्टा ट्रकच्या चाकात अडकला अन् तरुणीचा भयंकर अंत, नागपुरात दोघांनी जीव गमावला



**नागपूर:** नागपूर जिल्ह्यात रविवारी दोन भीषण अपघात घडले आहेत. पारशिवनी तालुक्यातील कन्हान पोलिस ठाण्याच्या हद्दीत स्कॉर्पियोने उभ्या ट्रकला मागून जोरदार धडक दिली. तर कामठी येथे नागपूर-जबलपूर मार्गावर ट्रकच्या चाकाखाली सापडल्याने एका तरुणीचा मृत्यू झाला. या दोन्ही अपघातांमध्ये दोघांचा मृत्यू तर आठ जण गंभीर जखमी झाले आहेत. शनिवारी रात्री तान्हा पोळा साजरा करून वर्धा जिल्ह्यातील सिंधी रेल्वे मार्गावरील गावातून मित्रमंडळी स्कॉर्पियोने परतत होती. त्यावेळी पारशिवनी तालुक्यातील कन्हान पोलिस ठाण्याच्या हद्दीत रात्री सुमारे दीड वाजताच्या सुमारास स्कॉर्पियो उभ्या ट्रकवर आदळली. ही धडक एवढी जबरदस्त होती की, स्कॉर्पियोचा पुढील भाग पूर्ण चकनाचूर झाला.या अपघातात प्रज्वल चव्हाण (निवासी निमखेडा बोरडा) याचा जागीच मृत्यू झाला. तर चेतन वाडीभस्मे, प्रणय कडू, प्रियंश बावणे, आकाश सोनेकर, रितिक चरडे, रितिक गडे हे सर्व निमखेडा बोरडा येथील तसेच प्रणय घोडेस्वार (निवासी बोधनी, ता. मोहाडी, जि. भंडारा) हे सर्वजण गंभीर जखमी झाले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. सर्व जखमींना आणि मृतदेहाला कामठी उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. या प्रकरणी ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. तर, दुसरी घटना रविवारी नागपूर-जबलपूर मार्गावर कामठीतील हॉकी बिल्डिंगसमोर घडली ज्यात दुपट्टा ट्रकमध्ये अडकून तरुणीचा मृत्यू झाला. मध्य प्रदेशातील कटनी येथील जागृती हुकुमचंद ठाकरे (२०) आपल्या भाचा सागर दुर्गाप्रसाद ठोमरे (१९) याच्यासोबत मोटारसायकलवरून जात होती. यावेळी समोरून येणाऱ्या ट्रकला ओव्हरटेक करताना जागृतीची दुपट्टा ट्रकला अडकला. आणि क्षणात ती ट्रकच्या चाकाखाली गेली. तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली तर दोन्ही पाय मोडले. अपघातात भाचा सागरही गंभीर जखमी झाला. तात्काळ पोलिसांनी दोघांनाही रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान जागृतीचा मृत्यू झाला. सागरवर उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे.नागपूर जिल्ह्यात एकाच दिवशी घडलेल्या या दोन अपघातांनी हळहळ व्यक्त केली जात आहे. एकीकडे तान्हा पोळ्याचा आनंद साजरा करून परतणाऱ्या तरुणांच्या गाडीस अपघात झाला, तर दुसरीकडे किरकोळ दुर्लक्षामुळे एका तरुणीला आपला जीव गमवावा लागला. पोलीस प्रशासनाने अपघातग्रस्तांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधला असून पुढील तपास सुरू आहे.

# तुला याच्यासोबत अफेयर करावं लागेल; अल्पवयीन मुलीचा फेसबुकवरील फोटो व्हायरल, त्रासाला कंटाळून पिडितेनं आयुष्य संपवलं



**नाशिक :** नाशिक शहरात अल्पवयीन मुलींनं आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. बळजबरीने प्रेम संबंध ठेवण्यास प्रवृत्त केल्यानं अल्पवयीन मुलींनं हे टोकाचं पाऊल उचललं आहे. या प्रकरणी नाशिकच्या अंबड पोलीस ठाण्यात तीन संशयित तरुणांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तीन मुलांनी अल्पवयीन मुलीला प्रेमसंबंध ठेवण्यास जबरदस्ती करत युवतीच्या सोशल मीडिया अकाऊंटचा युजर आयडी व पासवर्ड टाकत अकाऊंट उघडून युवतीसोबत गळ्यात हात घातलेला फोटो आणि त्यात तिचा बॉयफ्रेंड असल्याचं लिहित व्हायरल केला. त्यामुळे कॉलेजमध्ये बदनामी झाल्याने युवतीने टोकाचं पाऊल उचललं. सोशल मीडियावर बदनामीकारक पोस्ट केल्यानंतर संशयीत गणेश भांगरे याने मुलीला फोन करत शिवीगाळ करत त्रास दिला. यामुळे नैराश्यातून पिडीत मुलीने १२ ऑगस्ट रोजी रात्रीच्या सुमारास घरातील बेडरूमच्या सिलिंग फॅनला ओढणीच्या साह्याने गळफास घेत आत्महत्या केली.या प्रकरणातील संशयित गणेश भांगरे, अक्षय वरठे आणि आतिशकुमार वैद्य यांनी युतीच्या कॉलेजमध्ये येऊन तिला बळजबरीने गणेश भांगरे याच्यासोबत प्रेमसंबंध ठेवण्याकरिता देखील जबरदस्ती केल्याचं तक्रारीत म्हटलं आहे. या प्रकरणी मुलीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून दोघांना ताब्यात घेतलं आहे, तर एका फरार संशयित आरोपीचा पोलिसांकडून तपास सुरू आहे. या धक्कादायक घटनेनंतर नाशिक शहरात एकच खळबळ उडाली आहे.पोळ्याच्या दिवशी पारंपरिक पद्धतीने सर्जा-राजा या लाडक्या बैलजोडीची पूजा करताना हरवलेली दीड लाखाची दीड तोळे सोन्याची अंगठी राजा ने गिळल्याचे उघडकीस आले. बैल पोळ्याची ही घटना सर्वदूर चर्चेचा विषय ठरली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय आणि ग्रंथमित्र पुरस्कारासाठी ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज करावे

**जनसंचलन/ बुलढाणा**

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास, वाचकांसाठी चांगल्या सेवा व वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयामार्फत दरवर्षी ङ्कडॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कारफ्फ तसेच उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) यांना ङ्कडॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कारफ्फ देण्यात येतात. या पुरस्कारांतर्गत शहरी व ग्रामीण भागातील अ, ब, क व ड वर्गातील उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे एक लाख रुपये, ७५ हजार रुपये, ५० हजार रुपये व २५ हजार रुपये इतकी रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व ग्रंथभेट देऊन गौरविण्यात येणार आहे. याशिवाय, राज्यातील एक उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व एक उत्कृष्ट ग्रंथालय सेवक (ग्रंथमित्र) यांना प्रत्येकी ५० हजार रुपये तसेच प्रत्येक महसुली विभागातील प्रत्येकी एक कार्यकर्ता व सेवक यांना प्रत्येकी २५ हजार रुपये इतकी रोख रक्कम, सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट प्रदान करण्यात येईल. सन २०२४-२५ या वर्षासाठीचे अर्ज विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह तीन प्रतीत संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे दि. ३० सप्टेंबरपर्यंत पाठविण्याचे आवाहन ग्रंथालय संचालनालयाचे प्र. संचालक श्री. अशोक मा. गाडेकर यांनी केले आहे.

# उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेसाठी अर्ज करण्यास २६ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ



**जनसंचलन/बुलढाणा**

राज्य शासनाच्यावतीने या वर्षीपासून महाराष्ट्रातील गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा राज्य उत्सव म्हणून साजरा करण्यात येत आहे. या राज्य उत्सवाअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५फ साठी अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेस मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी या संदर्भात घोषणा करताना सांगितले की, आता अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख मंगळवार, दि. २६ ऑगस्ट २०२५ असेल. अधिकाधिक मंडळांना या स्पर्धेत सहभागी होता यावे, यासाठी मुदतवाढ दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या स्पर्धेचे अर्ज राज्य शासनाच्या अधिकृत https://ganeshotsav.pldmka.co.in या ऑनलाइन पोर्टलवर उपलब्ध आहेत. मंडळांनी ऑनलाइन पद्धतीनेच अर्ज सादर करावेत. या स्पर्धेत तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय पारितोषिके देण्यात येणार असून, गणेशोत्सव मंडळांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंत्री ॲड. शेलार यांनी केले आहे.


## आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा



## बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..

| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | गुंतवणुक रक्कम ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

### ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा...
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

## दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


# जिल्हा माहिती कार्यालयात भगवान श्री चक्रधर स्वामी यांना जयंतीनिमित्त अभिवादन



**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा माहिती कार्यालयात सोमवारी भगवान श्री चक्रधर स्वामी यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा माहिती कार्यालयातील वरिष्ठ लिपीक जयंत वानखेडे, वरिष्ठ लिपीक प्रेमनाथ जाधव, शिपाई राम पाटील, राजू घाडगे, वाहनचालक नामदेव घट्टे, पत्रकार रविंद्र फोलाने आदी उपस्थित होते.


पत्रकारीतेचा धर्म आम्ही निभावणार

सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क

दैनिक निडर निर्भीड जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिनानिमित्त बुलढाणा शहरातून भव्य शोभायात्रा

जनसंचलन/बुलढाणा

अखिल भारतीय पंचकृष्ण प्रबोधन परिषद श्री क्षेत्र जाळीचा देव बुलढाणा यांच्या वतीने सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन आणि महोत्सव महोत्सवानिमित्त बुलढाणा शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. प.पू. आचार्य श्री लोणारकर बाबांच्या मार्गदर्शनाखाली ही भव्य शोभायात्रा काढण्यात आली. सदर शोभायात्रा बुलढाणा श्री पंचकृष्ण मंदिर अजिंठा रोड बुलढाणा येथून धाड नाका मार्गे काढण्यात आली. यावेळी भव्य रथामध्ये श्री चक्रधर स्वामींची मूर्ती विराजमान होती. दरम्यान यावेळी पालखीचेही आयोजन करण्यात आले होते. ढोल-ताशांच्या गजरात, दिंडीतील लेझीम पथक आणि टाळ मृदंग असलेली ही शोभायात्रा बस स्टँड मार्गावरून संगम चौक, जयस्तंभ चौक, बाजार लाईन, कारंजा चौक, तहसील चौक, सर्कुलर रोड मार्गे सुरू झाली आणि धाड नाका मार्गे श्री पंचकृष्ण मंदिर, अजिंठा रोड बुलढाणा येथे समारोप करण्यात आला. या मिरवणुकीत एक हजार ते पंधराशे महानुभाव पुरुष आणि महिला भाविक पांढरे झेंडे घेऊन सहभागी होऊन फुगडी, टाळमृदुंगाच्या गजरामध्ये पावली खेळण्यात आली. मंगळवार, २६ ऑगस्ट रोजी सकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत देवतांचे मंगल स्नान, श्रीमद् भागवत गीता पारायण, सकाळी ८ ते ९ वाजेपर्यंत ध्वजारोहण, स्वागत, दीपप्रज्वलन कार्यक्रम, सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या तत्वज्ञानावर प्रबोधन आणि शोभायात्रेत दुपारी २ वाजेपासून सहभागी झालेल्यापैकी उत्कृष्ट भजनी मंडळास व उत्कृष्ट फलकास सन्मानचिन्ह, शाल श्रीफळ देऊन गौरविण्यात येणार आहे. दुपारी १२ वाजता पंचावतार उपहार आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.



सदर कार्यक्रमाच्या समारोप उपस्थितीमध्ये चिखलीच्या आ. श्वेताताई महाले. बुलढाणाचे आ. संजय गायकवाड, काँग्रेस कमिटी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, रिसोडचे आ. अमित झनक, मलकापूर आ. चैनसुख संचेती, पदवीधर मतदारसंघाचे आ.धीरजभाऊ लिंगाडे, अचलपूरचे आ. प्रविण तायडे अचलपूर, किरण सरनाईक आ.अमरावती, भाजपाचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे, जिल्हाध्यक्ष रा.कॉं. चे जिल्हाध्यक्ष नरेश शेळके, शिवसेना नेता डी.एस. लहाने, शिवसेनेच्या प्रवक्ता जयश्रीताई शेळके, गोविंदशेठ अग्रवाल, संजय गारूड, माजी आमदार धृपदराव सावळे आदी उपस्थित राहणार आहेत.

# विदर्भ महाविद्यालयात राज्यस्तरीय कविता महोत्सव संपन्न



जनसंचलन/ बुलढाणा

स्थानिक विदर्भ महाविद्यालय बुलढाणा येथे दिनांक २४/०८/२०२५ रविवार रोजी राज्यस्तरीय कविता महोत्सवाचे उद्घाटन विदर्भ महाविद्यालय येथे पार पडले या उद्घाटन कार्यक्रमाच्या सुरूवातीला सकाळी ८.०० वाजता महानुभाव गोपाल आश्रम अजिंठा रोड ते विदर्भ महाविद्यालय येथे भगवे रंगीबेरंगी पोषाख घातलेले विद्यार्थी व ढोल ताशासह लेझीम पथक, वासुदेव, भजनीमंडळ यासह विद्यार्थी पथसंचलन, वेशभुषा केलेले कलावंत साहित्यिक व मान्यवर यात सहभागी झाले होते. उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक रमेश इंगळे उत्रादकर बोलतांना म्हणाले की, ङ्गकविता हि आयुष्याचे दान मागतेङ्ग आज विपूल प्रमाणात हजारो कविता लिहिल्या जातात परंतू संत ज्ञानेश्वरांपासून आतापर्यंत बोटांवर मोजण्याईतके १०० कविंचेच नावे आठवतात इतर लिहिणारे असंख्य कवी काळाच्या ओघात वाहून जातात, तेव्हा कविता लिहितांना आपण कोठे आहोत याचा विचार कवींनी करावा. अध्यक्षीय भाषणात डॉ. संतोष पवार यांनी ङ्गकविता ही काळाच्या कसोटीवर टिकणारी असावीङ्ग असे प्रतिपादन केले. आजचे नव्वदोत्तरी कविता हि आज मराठी कवितेच्या केंद्रस्थानी आहे असे सांगितले. याप्रसंगी चित्रपट दिग्दर्शक निलेष जळमकर यांना ङ्गविदर्भभूषणङ्ग हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांनी आपल्या सत्काराला उत्तर देतांना सांगितले की, मी आजपर्यंत काढलेल्या चित्रपटात सामाजीक जाणीवांचा उहापोह केला आहे. स्वागताधक्ष प्रा. डॉ. कैलासराव के. पवार यांनी पाहुण्यांचे स्वागत करून बुलडाणा जिल्ह्याचा वाङःमयीन आढावा घेतला याप्रसंगी युवानेते कुणालभाउ गायकवाड यांनी या कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे आमदार धिरजभाउ लिंगाडे यांनी पश्चिम विदर्भात शेगावला एक विद्यापीठ व्हावे याची मागणी केली. याप्रंगी माजी प्राचार्य डॉ. दामोधर अंभोरे, प्रा. डॉ. अनंत शिरसाट, मालतीताई शेळके, विद्याताई माळी ,प्राचार्य विष्णूपंत पाटील, प्राचार्य डॉ. सुरेश बाठे, प्राचार्य डॉ. अविनाश मेश्राम, अशोक कोतवाल, अशोक कोळी, सुरेषभाउ पवार डॉ. संतोष आंबेकर, राजेंद्र काळे ओमसिंग राजपूत, डॉ. संगिताताई के. पवार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोविंद गायकी यांनी केले याप्रसंगी महाविद्यालयातील प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे बहारदार सुत्र संचालन रणजीतसिंग राजपूत आणि चंद्रशेखर जोशी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. मुनेश्वर जमईवारयांनीकेले


# नगर परिषद बुलडाणा कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी गजेंद्र दांदडे सर्वानुमते निवड

जनसंचलन/बुलढाणा

नगर परिषद बुलडाणा येथे आज दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या महत्वाच्या बैठकीत नगर परिषद कर्मचारी संघटनेची नवी कार्यकारिणी ठरली. या कार्यकारिणीमध्ये सर्वानुमते श्री गजेंद्र शालीग्राम दांदडे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. या निवडीमुळे नगर परिषद कर्मचाऱ्यांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून संघटनेला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. बैठकीस नगर परिषदेतील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये श्री शंकर उमळकार, उपाध्यक्ष पौर्णिमा सुस्ते, सचिव रमीज राजा रफिक चौधरी, तसेच संजय मुळे, राजेश गायकवाड, गौतम आराख, राजू आराख,



सतीश ताठे, सुनील काळे, गुलाबराव इंगळे आदींचा समावेश होता. सर्वांनी एकमुखाने गजेंद्र दांदडे यांना समर्थन देत त्यांच्यावर विश्वास व्यक्त केला. या निवडीच्या वेळी उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांनी टाळ्यांच्या गजरात अभिनंदन करत नव्या अध्यक्षांचा गौरव केला. यापुढील काळात कर्मचारी वर्गाच्या प्रश्नांवर ठोस लढा देत संघटनेला बळकटी देण्याचा विश्वास गजेंद्र दांदडे यांनी व्यक्त केला. त्यामुळे नगर परिषद कर्मचारी संघटनेत नवचैतन्याची लाट उसळली आहे.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८